# अंतरलहरी



कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया, मुंबई

जानेवारी - एप्रिल २०१९ वर्ष १२ अंक १ पृष्ठ १२ रु. २/-


## प्रतिमेच्या अधिकाराशिवाय कृती

**का**ल ज्या विषयावर आपण बोलत होतो तोच आपण पुढे नेऊया का? काल आपण म्हणत होतो की, विचाराने स्वत:च्या असामान्य क्षमतेनुसार वस्तुनिष्ठ स्तरावर आणि काल्पनिक स्तरावरही जग निर्माण केले आहे. संभ्रमाने भरलेले, भांडखोर, सतत अंतरंगात आणि बाहेरही संघर्षमय असलेले जग, तसेच तंत्रज्ञानाचे विस्मयकारक जग निर्माण केले; आणि त्याच वेळी विचाराने हे जग राष्ट्रवादामध्ये, धार्मिक श्रद्धांमध्ये, अनेक पंथांमध्ये, विविध धार्मिक विधींमध्ये विभागले आहे आणि विचाराने नातेसंबंधामध्ये सुद्धा एकमेकाविरुद्ध, म्हणजे वैयक्तिक विरुद्ध बाकी सगळे अशा तऱ्हेने विभाजन केले आहे आणि आपण म्हणालो की विचाराला जरी जीवनामध्ये फार महत्त्वाचे स्थान असले तरीही ते धोकादायी हत्यार आहे. विचार मोठमोठ्या प्रतिमा निर्माण करतो, अगदी अंतरंगामध्ये तसेच बाहेरही, आपल्या सर्व प्रकारच्या नातेसंबंधांमध्येसुद्धा. म्हणून आपल्या नातेसंबंधामध्ये विभाजन असते ज्यामुळे अनिवार्यपणे संघर्ष निर्माण होतोच आणि आपल्यामध्ये विलगता येते. आता काल आपण जे बोललो, त्याचा हा सारांश आहे. मला ते सगळे शब्दश: पुन्हा सांगणे कठीण आहे, तेव्हा आपण आता पुढे जाऊ या.

आपण म्हणालो की विचार म्हणजे प्रतिमा, ज्याला परिमाण असते आणि विचार एक प्रतिमा म्हणून अधिकार बनतो. मला माझ्याविषयीची एक प्रतिमा असते आणि मी त्या प्रतिमेप्रमाणे कृती करतो आणि ती प्रतिमा आणि कृती यामध्ये फरक असतो. आपण एकत्रपणे चर्चा करीत आहोत. मी भाषणे देत नाही, मला तो प्रकार आवडत नाही. किंबहुना आपण त्यावर चर्चा केली, ते एकत्रपणे आपण पाहिले, आणि त्याचा अगदी खोलात जाऊन शोध घेतला, तर ते माझ्या दृष्टीने योग्य होईल. या सकाळी शक्य असेल तर आपण प्रतिमेच्या संपूर्ण रचनेचा शोध घेऊया, स्वत:बद्दलच्या आणि इतरांविषयीच्या ज्या प्रतिमा आपण तयार केलेल्या असतात, त्या कशा निर्माण होतात, त्याला काही महत्त्व आहे किंवा नाही, त्या समर्पक आहेत किंवा नाहीत, आणि तिथे स्वातंत्र्य असते का आणि त्या स्वातंत्र्यामध्ये ह्या प्रतिमांचा अधिकाराच्या स्वरूपात हस्तक्षेत असतो का याचा आपण शोध घेऊया. बरोबर?

जीवन म्हणजे कृती, जगणे म्हणजे कृती करणे असते, जरी तुम्ही शांतपणे बसून ध्यान करण्याचा प्रयत्न करीत असाल, – तुम्हाला त्याचा काय अर्थ अभिप्रेत आहे ते मला माहीत नाही – तरी ती एक कृतीच असते, प्रत्येक गोष्ट कृती असते, जगणे ही कृती असते आणि त्या कृती करण्यामध्ये आंतर्विरोध असतो, ती कृती पूर्ण किंवा अर्धवट कृती असते. जेव्हा कृती पूर्ण असते तेव्हा तिथे खेद नसतो, मागे बघणे नसते किंवा दु:ख नसते. ते संपलेले असते. परंतु आपल्या बहुसंख्य कृती– आपल्या नातेसंबंधामधील कृती – पूर्ण नसतात आणि नातेसंबंधामधील अपूर्ण कृती ही आपण स्वत:विषयी किंवा दुसऱ्यांविषयी बाळगत असलेल्या प्रतिमांच्या अधिकारामुळे झालेली असते, नाही का? कृपया आपण एकत्रपणे याचा शोध घेऊया. ज्यामुळे त्या संबंधी आपल्याला काहीतरी समजेल. कारण या सकाळी जर आपल्याला शक्य झाले तर मुक्ती आणि भीती म्हणजे काय या प्रश्नाचा शोध घ्यायचा आहे.

आणि आपल्याजवळ ज्या या प्रतिमा असतात – तुम्हाला माहीत आहे प्रतिमा म्हणजे मला काय म्हणायचे आहे – तुमच्याजवळ तुमच्याविषयी प्रतिमा आहेत – डझनवारी, नाही का आणि या प्रतिमा कृती करताना अधिकार धारण करतात. बरोबर? उदाहरण द्यायचे तर जेव्हा आपल्याकडे समविचारी लोकांचे गट एकत्र राहत असतात (communes), आता जगात सगळीकडे असे लहान लहान गट पाहायला मिळतात, लहानसे गट, त्या कम्युन्समध्ये एकमेकांशी संघर्ष न होता सहजपणे, कार्यक्षमतेने काम करता यावे या हेतूने लोक एकत्र आलेले असतात. जर मी एखाद्या विशिष्ट कम्युनमध्ये सामील झालो तर ती कम्युन कशी असावी याबद्दलची प्रतिमा माझ्याजवळ असते. बाह्यत: जरी मी संस्थेचा अधिकार नाकारात असलो तरीही ती प्रतिमाच अधिकार बनते. अजूनही मी अधिकाराचा गुलामच असतो, बाहेरून मी ज्येष्ठ पिढीचा अधिकार नाकारत असतो आणि त्यांच्या सर्व कल्पना, श्रद्धा, परंपरा, त्यांच्या जगण्याच्या पद्धती नाकारत असतो आणि दुसरीकडे अधिकाराच्या विशिष्ट चौकटीला धरून असतो. आणि त्या प्रतिमेचा अधिकार जेव्हा दुसऱ्या प्रतिमेबरोबर संघर्षात येतो तेव्हा पुन्हा सत्ता गाजवतो आणि मग लवकरच कम्युनव्यवस्था कोसळून पडते. समाजात, प्रत्येक प्रस्थापित व्यवस्थेमध्ये असेच घडत असते, म्हणून अधिकाराच्या प्रतिमेशिवाय कृती करणे शक्य आहे का? कारण नाहीतर सहकारामधील आपले संबंध, सहजीवन यात विसंगती येते आणि संघर्ष निर्माण होतो. एक अधिकार दुसरा अधिकारावर सत्ता प्रस्थापित करतो. येथे राहणाऱ्या लोकांनी विशिष्ट प्रकारे वागले पाहिजे, अशा अपेक्षेने मी येथे येतो. तो माझा अधिकार असतो आणि तो अधिकार मी दुसऱ्यावर गाजवतो आणि मग मी आणि इथे असलेल्या लोकांमध्ये संघर्षाला सुरुवात होते. बरोबर?

म्हणून मी स्वत:ला विचारीत आहे, आणि मला वाटतं तुम्हीसुद्धा स्वत:ला विचारत असाल, की आपले नातेसंबंध असे असू शकतील का की ज्यामध्ये प्रतिमेच्या अधिकाराशिवाय आपल्यामध्ये सहकार्य असू शकेल? कारण जसे आपण जास्तीत जास्त पाहतो की जगात, मग ते युरोपमध्ये, अमेरिकेमध्ये, आशियामध्ये किंवा भारतामध्ये असो, ही समस्या अधिकाधिक महत्त्वाची बनत चालली आहे : संघर्षाशिवाय सहजीवन कसे असू शकेल, एकमेकांना सहकार्य देऊन काम कसे करायचे, असा चांगला समाज कसा निर्माण करायचा ज्यामध्ये प्रत्येक

*(पान २ वर)*

## संपादकीय

अधिकार म्हणजे वर्चस्व. जन्मापासून आपल्या आयुष्यात अधिकारी निर्माण होतात. पहिले अधिकारी पालक जे आपल्या भल्याचा विचार करून अधिकार गाजवतात. तो अधिकार त्यांच्याकडे पारंपरिक पद्धतीने आलेला असतो. त्यात आज्ञापालन असते, आव्हान नसते. काही अंशी, काही काळासाठी ह्या अधिकाराला जागा असते. परंतु जेव्हा तो सर्वस्वी स्वीकारार्ह होतो तेव्हा समस्या निर्माण होतात, जेव्हा तो बाह्य कारणांपुरता मर्यादित राहत नाही व आपल्या अंतर्मनाचा ताबा घेतो तेव्हा समस्या निर्माण होतात, स्वतंत्र विचार करण्याची क्षमता संपते. अंतर्मनाचे फुलणे थांबते. अध्यात्मिक वाढ तर दूरच राहते.

जीवनात तंत्रज्ञानाच्या अधिकाराला –जसे डॉक्टर, इंजिनीयर– एक योग्य व छोटीशी जागा आहे. परंतु त्यामुळे नकळत येणारी परावलंबनाची सवय अंतर्बाह्य जागा केव्हा व्यापते ते कळत नाही. शिवाय आपल्या मनाने निर्माण केलेले अधिकार असतात. ते आपल्याला जीवनाचा अर्थ समजून घेण्यापासून वंचित करतात. उदाहरणार्थ, कर्तव्य, निष्ठा, श्रद्धा, मते ह्यांनी आपण बांधले जातो. हे सर्व मनाचे स्वनिर्मित खेळ आहेत. पण ते सत्यापेक्षाही अधिक खरे वाटतात व प्रत्यक्ष जीवनातही त्यांचाच आधार घेतला जातो. माणूस कर्मठ बनतो. कर्मठपणा हे हिंसेचे मूळ आहे. ज्या मनामध्ये करुणा, प्रेम, प्रज्ञा, संवेदनशीलता बहरू शकते त्या मनाला अशा कर्मठपणामुळे मानव मुकतो.

अधिकारभावनेमुळे माणसाची खऱ्या अर्थाने शिकण्याची क्षमता नष्ट होते. बुद्धी गोठली जाते. म्हणून अधिकार हा शिक्षणातील अडथळा आहे असे कृष्णमूर्ती म्हणतात व गुरूपरंपरा नाकारतात.

हजारो वर्षांपासून चालत आलेल्या परंपरेच्या जोखडातून मोकळे होणे कठीण आहे. कृष्णमूर्तींचे विचार ऐकल्यानंतर आपण त्या अधिकारांच्या गुलामगिरीत जगत आहोत याची जाग आली तरी बरेच काही साध्य होईल, अशी जाग येणे खूप महत्त्वाचे आहे.

---

*(पान १ वरून पुढे...)*

प्रकारचा संघर्ष, अंतरंगातील संघर्ष – ज्याचे बाहेर युद्धामध्ये रूपांतर होते – अशा संघर्षाशिवाय आपण जगू शकू? याचा अर्थ मी स्वत:मध्ये जगण्याची एक पद्धत म्हणून जी प्रतिमा प्रस्थापित केली आहे, त्या प्रतिमेच्या अधिकाराशिवाय मी जगामध्ये अनेकांबरोबर किंवा थोड्या लोकांबरोबर जगू शकतो का?.

**प्रश्नकर्ता :** जेव्हा लोक त्यांचा एखादा अनुभव सांगतात तेव्हा असे दिसून येते की त्यांनी प्रतिमा निर्माण केलेली असते आणि ज्यांना असा अनुभव आलेला नसतो ते ती प्रतिमा समजून घेऊ शकत नाही.

**कृष्णमूर्ती :** म्हणजे अनुभवच ती प्रतिमा बनतो. ती प्रतिमा अधिकाराचे रूप धारण करते. मला माहीत आहे आणि तुम्हाला माहीत नाही. मी निर्वाणाचा, ईश्वराचा – जे काही असेल ते, त्याचा अनुभव घेतला आहे आणि तुम्हाला तो अनुभव नाही. तुम्ही बिचारे दुर्दैवी, अडाणी मनुष्य आणि मी तसा नाही. हा सगळाच मूर्खपणा असतो. तेव्हा हा अगदी गंभीर प्रश्न आहे. त्याचे मोघम वरवरचे उत्तर देता येणार नाही किंवा त्याचे समर्थन करता येणार नाही. परंतु त्याचे सखोल परीक्षण केले पाहिजे आणि शोध घेतला पाहिजे. जर मानवी मनाने त्याच्या स्वत:च्या सुरक्षिततेसाठी, इतरांशी असलेल्या नातेसंबंधांशी निगडित अनेकानेक प्रतिमा ज्ञान म्हणून निर्माण केल्या असतील आणि जर त्या प्रतिमा टिकून राहिल्या तर तिथे विभाजन होतेच आणि म्हणून नात्यामध्ये संघर्ष येत असतो. विचार या प्रतिमा निर्माण करतो आणि तिथे विचारावर आधारित परंतु प्रतिमेशिवायचे नातेसंबंध असू शकतात का आणि तिथे जर प्रतिमा नसेल तर ते प्रेम असते का? कृपया लक्ष द्या. तर मग अधिकारभावनेशिवाय कृती असू शकते का?

*ब्रॉकवुड पार्क १९७१*, व्याख्यान २

---

# सद्गुणाला अधिकारभावना नसते

मन अधिकारमुक्त होऊ शकते का? म्हणजेच भीतीमुक्त ज्यामुळे ते कोणाचेही अनुसरण करण्यास तयार नसते? तसे असेल तर अनुकरण करणे – जी एक यांत्रिक प्रक्रिया असते – तिचा शेवट होतो. अखेर सद्गुण, नैतिकता म्हणजे जे चांगलं आहे त्याची पुनरावृत्ती करणे नव्हे, ज्या क्षणी ते यांत्रिक बनते त्या क्षणी तिथे सद्गुणाचा अंत होतो. सद्गुण ही एक अशी गोष्ट असते जी क्षणाक्षणाला प्रतीत होत असते, विनयशीलतेसारखी. विनयशीलता ही प्रयत्न करून येत नाही आणि ज्या मनाला विनयशीलता नाही ते मन शिकू शकत नाही. म्हणून सद्गुणाला अधिकारभावना नसते. सामाजिक नैतिकता ही नैतिकता नसतेच मुळी. ती अनीती असते. कारण ती स्पर्धेला, लोभाला आणि महत्त्वाकांक्षेला मान्यता देते आणि म्हणून समाज अनीतीला प्रोत्साहन देतो. सद्गुण ही अशी गोष्ट आहे जी नीतीच्या पलिकडची आहे. सद्गुणाशिवाय व्यवस्था नसते आणि ही व्यवस्था एखाद्या साच्याप्रमाणे, एखाद्या गणिती सूत्राप्रमाणे नसते जे मन स्वत:ला शिस्त लावून, सद्गुण मिळविण्यासाठी एका आखीव पद्धतीप्रमाणे अनुकरण करते, ते स्वत:साठी अनीतीच्या समस्या निर्माण करते.

जेव्हा मन खरा सद्गुण म्हणजे काय हे समजण्यासाठी शोध घेते त्यावेळी मनाने निर्माण केलेला जो बाह्य अधिकार असतो –कायद्याखेरीज– देव, धर्म, नीती वगैरे, तो अधिकार विनाशकारक बनतो. आपण ज्ञान, अनुभव यांच्या आधाराने अनुकरण करण्याचा प्रयत्न करतो आणि ते ज्ञान, ते अनुभवच आपली अधिकारवृत्ती धारण करतात. इथे सतत पुनरावृत्ती होत असते. अनुकरण हे आपल्याला माहितच आहे. मानसिक अधिकार – कायद्याचा किंवा पोलिसांचा अधिकार सोडून – जो आपल्या प्रत्येकाकडे असतो, तो सद्गुणाचा शत्रू असतो. कारण सद्गुण हा सदैव जिवंत सचेतन असतो. जसे तुम्ही विनयशीलतेची जोपासना करू शकत नाही, जसे तुम्ही प्रेमासाठी प्रयास करू शकत नाही, तसेच सद्गुण मिळविण्यासाठी तुम्ही मशागत करू शकत नाही आणि त्यातच त्याचे सौंदर्य दडलेले आहे. सद्गुणामध्ये यांत्रिकता नसते आणि सद्गुणाशिवाय स्पष्ट विचार करण्याचा पाया असणार नाही.

*The Book of Life:*
*Daily Meditations with Krishnamurti,* 16 January

# आज्ञापालनः भीती अधिकारशाहीला जन्म देते

**जी**वनातील अत्यंत महत्त्वाच्या गोष्टींपैकी एक, कदाचित सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे स्वातंत्र्य. हुकुमशाही तसेच लोकशाही प्रशासनांमध्ये ह्या शब्दाचा मोठ्या प्रमाणावर गैरवापर केला गेला आहे आणि जगभरातील धर्मांनी त्याचा दुरूपयोग केला आहे. वैज्ञानिक जग सोडले तर कदाचित व्यक्तिगत स्वातंत्र्य अस्तित्वातच नाहीत. औद्योगिक क्षेत्रात किंवा माणसाने भीती आणि श्रद्धेतून उभारलेल्या धार्मिक रचनांमध्ये स्वातंत्र्य असू शकत नाही. प्रशासनांमध्ये किंवा इतर कुठल्याही मानवी कार्यक्षेत्रात स्वातंत्र्य असत नाही. परंतु माणूस सतत सांगत आला आहे की तो स्वतंत्र आहे आणि परिस्थितीने त्याला गुलाम बनवले आहे, अशी त्याची तक्रार आहे. पण स्वातंत्र्य म्हणजे काय? स्वत:च्या जीवनाच्या संदर्भात स्पष्टपणे विचार करणे. समाजाच्या किंवा स्वत:च्या मनोप्रवृत्तीच्या हुकमतीखाली आचरण करणे म्हणजे स्वातंत्र्य नव्हे. हे फार कठीण आहे. आपल्या सर्वांना परिचित असलेल्या नेहमीच्या दु:खावस्थेहून पूर्णपणे वेगळ्या अशा जीवनाचा शोध घेणे किंवा ते जगणे हे स्वातंत्र्याशिवाय शक्यच नाही.

स्वातंत्र्य म्हणजे एखाद्या गोष्टीच्या 'कचाट्यातून मुक्त होणे' नव्हे; ते स्वयंभू असते. ह्याचा अर्थ असा नव्हे की मन मानेल तसे करावे. म्हणून फक्त शाब्दिक नव्हे तर प्रत्यक्षात त्या शब्दाचा गर्भितार्थ काय आहे हे समजले पाहिजे. आम्ही स्वातंत्र्य म्हणजे काय ह्याची व्याख्या करण्याचा प्रयत्न करत नाही आहोत. प्रत्येक जण आपल्या कल्पना, वृत्ती किंवा ज्या प्रकारे त्यांचे संगोपन केले गेले त्याप्रमाणे त्याचा अर्थ लावतील, आणि स्वातंत्र्य अशी काही चीज असते हे देखील काही जण नाकारतील. स्वातंत्र्य हे शोधून मिळत नसते, तर मनाला काय जखडून टाकते ते समजण्याने मिळते. जेव्हा ह्या बंधनाच्या भिंती कोसळतील तेव्हा तिथे साहजिकच स्वातंत्र्य असेल, मग ते शोधायला नको. म्हणून स्वातंत्र्य कसे मिळवावे किंवा स्वातंत्र्य म्हणजे काय हा प्रश्न विचारणे महत्त्वाचे नाही, तर मन – जे कालाची व सभोवतालच्या वातावरणाची निष्पत्ती आहे आणि ज्याला दु:ख व संघर्षाचे अतोनात अनुभव आले आहेत ते मन – का मुक्त नाही हा प्रश्न विचारणे महत्त्वाचे आहे.

हजारो वर्षांनंतर मन अजूनही इतके संस्कारांच्या भारी दबावाखाली का राहिले हे शोधणे महत्त्वाचे आहे. हा एक तुरुंग आहे. समाजाची संस्कृती, त्याचे कायदे, त्याचे धार्मिक संदेश, त्याचे आर्थिक दबाव ह्यातून मन संस्कारबद्ध केले जाते. शेवटी मन हे भूतकाळाची परिणती आहे, आणि भूतकाळ म्हणजे परंपरा. मन ह्या परंपरेत राहते जिथे झगडे, युद्धे, वेदना ह्या सर्व गोष्टी आहेत. ते स्वत:च्या संस्कारबद्धतेपासून मुक्त होऊ शकेल का हा प्रश्न विचारला पाहिजे. काहींचे म्हणणे आहे की ते संस्कारबद्धच राहणार आणि कधीही मुक्त होऊ शकणार नाही. दुसरे काही म्हणतात की संस्कारबद्धतेपासूनची मुक्ती इहलोकात मिळूच शकत नाही, ती फक्त केव्हातरी भविष्यात स्वर्गात मिळेल, किंवा दीर्घ तपांच्या, नियमनाच्या, धार्मिक म्हटल्या जाणाऱ्या पद्धतींच्या योजनाबद्ध स्वीकाराच्या शेवटी असेल. संस्कारबद्धतेपासून मुक्ती असल्याशिवाय मानव कैदीच राहील व जीवन हे रणांगणच असेल.

हा शोध घेताना सर्वात आधी आपल्याला अधिकारशाहीचे गुणधर्म समजून घ्यावे लागतील. कुठल्याही समाजात कायदा व पोलीस आवश्यक आहेत, परंतु आपण विचार व भावनांच्या आंतरिक जगातही पोलीस उभे केले आहेत. ह्या जगात परंपरा, अनुभव, सवयी ह्यांनी आज्ञाधारकपणाला स्थान दिले आहे–पालक, समाज, धर्मगुरू ह्यांचे आज्ञापालन. परंतु आज्ञाधारकपणा हा भीतीतून निर्माण होतो–अंदाज चुकण्याची भीती, स्वतंत्र बाण्याने वागण्याची भीती, असुरक्षिततेची, समाजाचा भाग नसण्याची भीती, एकटे पडण्याची व चूक करण्याची भीती. म्हणून भीती अधिकारशाहीला जन्म देते; समाजाने प्रस्थापित केलेल्या आदरणीय, स्वीकारार्ह मार्गाने जगायचे असते. ही भीतीच मन संस्कारित करते, समाज घडवते व मन त्याचेच गुलाम बनले आहे. भीती, स्वार्थ, महत्त्वाकांक्षा इत्यादींमधून मनाने समाज घडवला आहे.

भीती, चिंता, मत्सर ह्यांचे साधे निरीक्षण म्हणजे शिस्त आहे – शिस्त जी कुठल्याही अनुवर्तनाशिवाय सहज येते; एखादे झाड पाहावे त्याप्रमाणे आपली भीती, महत्त्वाकांक्षा पाहणे म्हणजे शिस्त. ते बघणे हीच ती शिस्त. शिस्त–इंग्रजी शब्द discipline– त्याचा अर्थ 'शिकणे' असा आहे, अनुवर्तन नव्हे, दडपण किंवा आज्ञापालन नव्हे. संस्काराचे गुणधर्म व घडण ह्याबद्दल शिकण्यातून व्यवस्था येते, ती समाजाची व्यवस्था नव्हे जी खरी तर अव्यवस्थाच आहे.

म्हणून युद्धे, द्वेष, भांडण, गोंधळ ह्यासह जग पाहणे म्हणजेच तुम्ही स्वत: आहात तसे स्वत:ला पाहणे. तुम्ही जसे आहात तसे स्वत:ला पाहणे म्हणजे तुम्ही काय आहात त्यातून तुम्ही जे जग निर्माण केले आहे ते पाहणे. हे पाहण्यात मुक्ती आहे. धोका कळण्यातून धोका टाळला जातो. माणसाच्या संस्कारांच्या ओझ्याचा हा धोका जाणणे म्हणजे संस्कारबद्धता टाळणे. ह्या सगळ्यात महत्त्वाचे आहे ते म्हणजे 'पाहणे'– केवळ ज्ञानचक्षूंनी नाही तर प्रत्यक्ष चर्मचक्षूंनी पाहणे.

*Letters to Schools - The Whole Movement of Life is Learning,* Chpt. 58

---


# अधिकार हा नेता आणि अनुयायी या दोघांनाही भ्रष्ट करतो

**स्व**भान हे फार कठीण असते, आणि आपल्यापैकी बहुतेक जण सोपा, आभासमय मार्ग पसंत करतात. म्हणून जो अधिकार आपल्या जीवनाला एक साचेबंदपणा, एक आकार देतो त्या अधिकाराचा आपण स्वीकार करतो. हा अधिकार सामुहिक, शासकीय वा वैयक्तिक असेल किंवा मास्टर्स, योगी वा गुरू यांच्या स्वरूपातला असेल. कोणत्याही प्रकारचा अधिकार हा आंधळा असतो. तो विचारशून्यता निर्माण करतो आणि आपल्यापैकी बहुतेकांना विचारशील असणे हे दु:खकारक असते असे वाटते. म्हणून आपण स्वत:ला अधिकारशाहीच्या हाती सोपवतो. अधिकार सत्ता निर्माण करतो. सत्ता नेहमीच केंद्रित झालेली असते आणि म्हणून ती अत्यंत भ्रष्ट करणारी असते, ती फक्त सत्ता ग्रहण करणाऱ्यालाच भ्रष्ट करते असे नव्हे तर जो त्याचे अनुसरण करतो त्यालाही भ्रष्ट करते. ज्ञानाचा आणि अनुभवाचा अधिकार हा भ्रष्ट करणारा असतो, मग तो गुरूमध्ये सामावलेला असेल किंवा त्याच्या अनुयायामध्ये असेल किंवा पुरोहितामध्ये असेल. हे तुमचे स्वत:चे जीवन आहे आणि हा अनंत काल चालणारा संघर्ष, हे महत्त्वपूर्ण आहे, विशिष्ट साचा किंवा गुरू महत्त्वाचे नव्हेत. गुरू, पुरोहिताचा अधिकार तुम्हाला मुख्य विषयापासून दूर नेतो आणि हाच तुमच्यामध्ये असलेला संघर्ष आहे.

*The Book of Life: Daily Meditations with Krishnamurti,* 21 January

# राजघाट वाराणसी येथील KFI चे वार्षिक संमेलन २०१८





कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडियाचे वार्षिक संमेलन या वर्षी राजघाट वाराणसी येथे ३१ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर २०१८ या दिवसात भरले होते. संमेलनाचा विषय होता Crisis in Society & Individual Responsibility – समाजावरील आपत्ती आणि वैयक्तिक जबाबदारी. जवळ जवळ २०० अभ्यासक या संमेलनामध्ये सहभागी झाले होते.

पहिल्या दिवसाची सुरुवात फाउंडेशनचे मुख्य सचिव श्री. कंदास्वामी यांच्या भाषणाने झाली. माणसामाणसांमधील नातेसंबंधांमधील संघर्ष ही समाजावरील सर्वात मोठी आपत्ती आहे असे म्हणून त्यांनी इतर अनेक गोष्टींशी असलेल्या आपल्या नातेसंबंधांकडे – जशा आपल्या कल्पना, विशिष्ट विचारधारा, धर्म, संपत्ती, मालमत्ता इत्यादींशी असलेल्या आपल्या संलग्नतेकडे श्रोत्यांचे लक्ष वेधले. शिक्षण, राजकारण, संस्कृती, पर्यावरण, अर्थव्यवस्था अशा अनेक क्षेत्रांमध्ये होत असलेल्या ऱ्हासाकडे प्रामाणिकपणे पाहण्याचे आणि आपल्या नातेसंबंधांचे सखोल निरीक्षण करण्याचे त्यांनी श्रोत्यांना आवाहन केले.

त्यानंतर लहान गटांमधून झालेल्या संवादांमध्ये विविध प्रश्नांवर चर्चा झाल्या: जीवनातील आव्हानांना समग्रतेने सामोरे जाणे म्हणजे काय? आपण जीवनातील प्रत्येक आव्हानाला संवेदनशीलतेने सामोरे जाऊ शकू का? आपण सर्व गोष्टी तुलना न करता, त्याबद्दल प्रतिमा तयार न करता समजून घेऊ शकू का? आणि वर्तमानामध्ये जगू शकू का? अशा विविध प्रश्नांवर चर्चा झाल्या.

त्या दुपारी संमेलनात सहभागी झालेल्या अभ्यासकांना सभोवतालच्या परिसराचा फेरफटका करण्यासाठी नेण्यात आले, सायंकाळी कृष्णमूर्तींच्या भाषणाचा व्हिडिओ दाखविण्यात आला.

दुसऱ्या दिवशी पुण्याजवळील सह्याद्री स्कूलचे डॉ. शैलेश शिराळी यांचे 'बदलाची निकड' या विषयावर भाषण झाले. माणसामधील लालसी वृत्तीमुळे निर्माण झालेल्या आपत्ती, अनावश्यक–क्षुद्र गोष्टींमध्ये चित्त मग्न राहत असल्यामुळे निर्माण होत असलेली विपरितावस्था, या साऱ्या परिस्थितीला तरुणांनी कसे सामोरे जावे या गोष्टींचा त्यांनी शोध घेतला. माणसं सत्ता, कल्पना, चिन्हे, राष्ट्रवाद, खेळजगत, करमणुकीची साधने, धर्म, प्रदेश इत्यादींबद्दलच्या क्षुल्लक बाबींमध्ये गुरफटून गेली आहेत आणि हे अत्यंत विनाशकारी आहे. आजची तरुण पिढी काय करू शकते याबद्दलचे विचार मांडताना विज्ञानाबद्दल आज असलेली उदासिनता, विज्ञानक्षेत्राला अलिकडच्या काळात लागलेली उतरती कळा, बऱ्याच अंशी त्याबद्दल असलेली दोषैकवृत्ती या गोष्टींबद्दल त्यांनी घोर चिंता व्यक्त केली. अधिकाधिक मिळविण्याच्या हव्यासापोटी आणि विकासाच्या नावाखाली निसर्गाचा जो प्रचंड विनाश चालविला आहे तोच आपल्या या समाजातील भयानक ताणतणावाच्या मुळाशी असू शकेल का? असा प्रश्न करून आपण या पृथ्वीवर एक पाहुणा म्हणून राहून, या धरतीवर हळुवारपणे, काळजीपूर्वक जीवनाची वाटचाल करू शकणार नाही का, या प्रश्नाने त्यांनी भाषणाचा समारोप केला.

त्यानंतर झालेल्या गटाचर्चांमधून खालील काही मुद्द्यांवर संवाद झाले: एकत्र विचारमंथन करण्याची सुरुवात कशा प्रकारे करावी? प्रतिमा म्हणजे काय आणि प्रतिमांपासून आपल्याला कोणत्या अपेक्षा असतात? निरव शांततेच्या क्षणामध्ये कुठचीही प्रतिमा अस्तित्वात असते का? आपण जेव्हा कंटाळवाणेपणापासून पलायन करण्याचा प्रयत्न करीत नाही तेव्हा काय होते? आपण आत्मबोधामधून येणारे शहाणपण–सुबुद्धी आणि ज्ञान यांची जोपासना कशी करू शकू? आंतरिक परिवर्तनातून समाजामध्ये बदल घडून येऊ शकेल का? इ.

दुपारी शिबिरार्थींना वाराणसी शहराचा फेरफटका करण्यासाठी तसेच नावेतून सफर करण्यासाठी नेण्यात आले. रात्रीच्या जेवणानंतर कृष्णमूर्तींच्या भाषणाचा व्हिडिओ दाखवण्यात आला.

तिसऱ्या दिवशी चेन्नईजवळील 'पाठशाला' या निवासी शाळेचे डायरेक्टर श्री. जी. गौतमा यांचे 'शिक्षणामधील आव्हाने' या विषयावर भाषण झाले. ते म्हणाले की शिक्षणाचा हेतू केवळ आजच्या आर्थिक आणि सामाजिक चौकटीत बसणारा मनुष्य घडविणे हा नसून एक जबाबदार चांगला नागरिक कसा निर्माण करता येईल हा असला पाहिजे. शाळा या सुबुद्धीचे केंद्र असल्या पाहिजेत आणि तेथे एकत्रपणे, सहभागाने काम करण्याचे मूल्य जोपासले गेले पाहिजे. केवळ आपल्या वैयक्तिक फायद्याचा सांभाळ करण्याच्या उद्देशाने तेथील शिक्षणव्यवस्थेचा मूकपणे स्वीकार करण्याऐवजी विद्यार्थ्यांमध्ये सहभागाच्या भावनेने प्रश्न उभे करण्याची जबाबदार वृती जोपासली गेली पाहिजे. शिक्षकाची भूमिका ही प्रचलित सामाजिक मूल्यांना आंधळेपणाने पाठिंबा देण्याची नसावी तर त्या मूल्यांबद्दल गंभीरपणे, सूक्ष्मदृष्टीने प्रश्न उपस्थित करण्याची असावी. अनेक महत्त्वाचे मुद्दे श्री. गौतमा यांनी मांडले.

लहान गटचर्चांमधून खालील काही मुद्द्यांवर चर्चा केली गेली: शाळेमध्ये शांतपणे श्रवण करू शकण्याचे वातावरण कसे निर्माण करता येईल? तंत्रज्ञानामध्ये प्रावीण्य मिळवत असतानाच विद्यार्थी आंतरिक चिंतन करण्याची क्षमतादेखील आत्मसात करू शकावेत यासाठी शिक्षणपद्धतीत कशा प्रकारचे बदल करण्याची गरज आहे? आपण आपल्याला ज्या गोष्टीमध्ये रस असतो त्या गोष्टींकडेच लक्ष पुरवतो, आणि इतर सर्व गोष्टी, कल्पना, विचार इत्यादींकडे दुर्लक्ष करतो, असे का? आपले मन धर्मशील कसे बनू शकेल? अशा काही प्रश्नांवर चर्चा केली गेली.

त्या संध्याकाळी ठुमरी-दादरा गायकी आणि संत कबीराचे दोहे यांमध्ये निपुण असलेल्या श्रीम. विद्या राव यांच्या सुश्राव्य शास्त्रीय गायनाचा आनंद सर्व पाहुण्यांनी घेतला.

संमेलनाच्या शेवटच्या दिवशी आयोजित करण्यात आलेल्या परिसंवादात श्री. सिद्धार्थ मेनन, श्री. के. कृष्णमूर्ती, श्री. अमरेश कुमार व श्री. मुकेश गुप्ता सहभागी झाले होते. परिसंवादामधून संमेलनातील भाषणे-चर्चा यामधून निर्माण झालेल्या प्रश्नांवर सखोल चर्चा झाली.

माणसामध्ये मूलभूत परिवर्तन झालेले नसले तर चांगल्या उद्देशाने केल्या जाणाऱ्या सामाजिक सुधारणा आजच्या काळातील आपत्काळाला सामोरे जाण्यास अपुऱ्या पडतील, ह्या कृष्णमूर्तींच्या विधानाचे फाउंडेशनच्या प्रकाशन विभागाचे मुख्य सचिव श्री. के. कृष्णमूर्ती यांनी विवरण केले. श्री. सिद्धार्थ मेनन यांनी श्रोत्यांना सल्ला दिला की परिवर्तनाच्या कल्पनेने भयभीत न होता आपल्या रोजच्या जीवनात होणाऱ्या अगदी लहानसहान अर्थपूर्ण बदलांकडे लक्ष दिले पाहिजे. श्री. मुकेश गुप्ता यांनी प्रश्न उपस्थित केला की आपल्या रोजच्या आयुष्यात आणि नातेसंबधांमध्ये येणाऱ्या आव्हानांबद्दल आपण कितीसे संवेदनशील असतो, आणि जाग येण्यासाठी आपण मोठ्या आपत्तीची वाट का पाहतो?

या संमेलनातील विचारमंथनामुळे निर्माण झालेले प्रश्न सोबत घेऊन सर्वांनी संमेलनाचा निरोप घेतला.

## मुक्त शिक्षण



**बॉ**म्बे केंब्रिज गुरुकुल समुहातील डॉ. राधाकृष्णन् शाळेच्या सहकार्याने मुंबईमध्ये ११ ते १४ जुलै २०१८ या दिवसात शैक्षणिक कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या होत्या. विषय होता Education Without Borders. व्हॅली स्कूल, बेंगलुरूमधील श्री. गोपालन यांनी या कार्यशाळेचे संयोजन केले आणि त्यांच्याबरोबर त्यांचे सहशिक्षक श्रीम. शोभा, श्रीम. रिचा आणि श्रीम. सुनीता होत्या. ११-१२ जुलैला झालेल्या कार्यशाळेत मुंबई, पुणे येथून जवळजवळ ९० शिक्षक सहभागी झाले होते. डॉ. एस. राधाकृष्णन् शाळेतील सुमारे १०० शिक्षकांनी १३ जुलैला झालेल्या कार्यशाळेत भाग घेतला. २०० हून अधिक पालक १४ जुलै रोजी झालेल्या कार्यशाळेत सहभागी झाले. ही कार्यशाळा प्राथमिक आणि माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांच्या पालकांसाठी दोन वेगळ्या सत्रांमध्ये घेतली होती.

वर्गामध्ये शिकविण्याच्या तसेच शिकण्याच्या पद्धतीमध्ये हे सर्वांगीण शिक्षण कशा प्रकारे प्रभाव टाकू शकते आणि त्यासंबंधीचा दृष्टिकोन कसा ठरवू शकते याचा एकत्र शोध घेणे हा या कार्यशाळांचा उद्देश होता. श्री. गोपालन यांनी या विषयासंबंधीचे अनेक धागे शिक्षकांबरोबरच्या संवादांमध्ये उलगडून दाखविले. उदा. शिक्षणाचा हेतू, विचार करणे, शिकणे आणि आकलन होणे, स्पर्धा आणि इतर प्रेरक हेतू वगैरे. श्रीम. सुनीता पर्यावरणाविषयी शिकवताना मुलांचे कुतूहल कसे जागे करावे, तसेच एक पालक आणि शिक्षक अशा दुहेरी भूमिकेतून आपला स्वत:चा अनुभव काय आहे याविषयी बोलल्या. मुलांशी प्रेमाचे आणि जिव्हाळ्याचे अनुबंध निर्माण करणे, या वाटचालीमध्ये आपल्या शिकवण्याच्या, मुलांशी संवाद साधण्याच्या पद्धतीमध्ये जरुरीप्रमाणे फेरफार करत जाणे, या एकत्र प्रवासात मुलांबरोबर आपणही शिकत राहणे अशा संवेदनशील बाबींवर श्रीम. शोभा यांनी आपले विचार मांडले. श्रीम. रिचा यांनी 'असीमित शिक्षणा'च्या संदर्भात विद्यार्थ्यांच्या मनामध्ये प्रश्न उभे करण्याची वृत्ती जोपासण्याचे महत्त्व, शिकवत असताना आपल्या कृतीबद्दल, त्यामागील हेतूबद्दल, आपल्या मनोव्यापाराबद्दल शिक्षकाने स्वत:लाच पृच्छा करण्याचे महत्त्व अशा चिंतनपर पैलूंवर चर्चा केली. या बाबतीतले आपले स्वत:चे अनुभवही त्यांनी प्रामाणिकपणे सांगितले.



कार्यशाळांमध्ये दृकश्राव्य माध्यमातून व्हॅली स्कूलमधील काही शिक्षणपद्धतींचे सादरीकरण करण्यात आले. कार्यशाळांमध्ये सहभागी झालेल्या शिक्षकांनी अनेक प्रश्न उपस्थित केले. प्रत्येक कार्यशाळेमध्ये श्री. गोपालन यांनी काही प्रखर मुद्दे मांडले. आधुनिक जीवनशैलीचा शिक्षणावर पडणारा प्रभाव, सुरक्षित वाटणाऱ्या वातावरणामध्ये जसे चालले आहे तसेच आपले जीवन आणि मुलांचे शिक्षण चालू ठेवण्याऐवजी काहीसे धाडसी निर्णय घेऊन आपला जीवनमार्ग बदलण्याची गरज यावर त्यांनी श्रोत्यांना विचार करण्याचे आवाहन केले. सहभागी शिक्षक व पालक दोघांनाही जीवनातील या महत्वाच्या बाबींवर चिंतन करण्यास या कार्यशाळांमधून बरेच काही मिळाले असावे.


सर्व शिक्षकांना 'Why Are You Being Educated?' हे पुस्तक देण्यात आले. 'On Learning' हे हिंदी आणि इंग्रजी अशा द्विभाषीय रचनेचे पुस्तक सर्व पालकांना देण्यात आले.


### शिक्षकांसाठी कार्यशाळा

सह्याद्री स्टडी सेंटर येथे २२ ते २४ नोव्हेंबर या दरम्यान बदलापूर परिसरातील शिक्षकांसाठी 'योग्य शिक्षण म्हणजे काय' या विषयावर एक कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. हे शिक्षक प्रथमच अशा प्रकारची शाळा पाहत होते व कृष्णमूर्तींचा शिक्षण विषयक दृष्टिकोन समजून घेत होते.

कृष्णमूर्तींच्या शिक्षण-जीवनदृष्टीच्या विविध पैलूंची ओळख करून देण्याच्या उद्देशाने एका विशिष्ट संस्थेसाठी किंवा गटासाठी अशा कार्यशाळांची नियमितची सत्रे आयोजित करणे शक्य आहे. त्यासाठी कृपया सह्याद्री अध्ययन केंद्र(पृ. ९) किंवा मुंबई केंद्र (पृ. १२) यांच्याशी संपर्क साधावा.

# स्टोरीटेलच्या मोबाईल ॲपद्वारे मराठी ऑडिओ पुस्तके उपलब्ध




कृष्णमूर्तींच्या अनेक पुस्तकांचे भारतातील विविध प्रादेशिक भाषांमधून अनुवाद झाले आहेत. इंटरनेटच्या आधुनिक युगात बऱ्याच वाचकांचा कल मोबाईल वा वैयक्तिक संगणकाचा वापर करून दृकश्राव्य माध्यमांमधून वाचन, श्रवण करण्याकडे झुकतो आहे, हे ध्यान्यात घेऊन आता कृष्णमूर्तींच्या अनुवादित पुस्तकांच्या ध्वनिमुद्रित आवृत्या (ऑडिओ बुक्स) मोबाईलवरील ॲपच्या माध्यमातून प्रकाशित करण्यात येत आहेत. कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडियाच्या मुंबई केंद्राने स्टोरीटेल इंडियाच्या सहकार्याने हा उपक्रम हाती घेतला आहे.

पहिल्या टप्प्यात 'ज्ञातापासून मुक्ती' (Freedom From the Known) आणि 'या गोष्टींचा विचार करा' (Think On These Things) या दोन मराठी पुस्तकांच्या ध्वनिमुद्रित आवृत्या प्रकाशित झाल्या आहेत. पुढच्या टप्प्यात हिंदीमधून आणि त्यानंतर इतर प्रादेशिक भाषांमधून अशी ऑडिओ पुस्तके उपलब्ध केली जातील. आजच्या संघर्षमय, गोंधळलेल्या परिस्थितीत जीवनाचा अर्थ शोधणाऱ्या तरुण पिढीच्या मनाला भिडणारे असे हे जीवनभाष्य आता आधुनिक माध्यमामधून मराठी श्रोत्यांपर्यंत पोहोचत आहे. या निमित्ताने ८ डिसेंबर, २०१८ रोजी लोअर परळ येथील 'द इंटीग्रल स्पेस' या ठिकाणी एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला कृष्णमूर्तींच्या Conditioning-Prisoners of the Past (संस्कारबद्धता-भूतकाळाचे कैदी) या विषयावरील भाषणाचा संक्षिप्त व्हिडिओ दाखविण्यात आला. श्री. अजित केळकर -ज्यांच्या आवाजात 'या गोष्टींचा विचार करा' या पुस्तकाचे ध्वनिमुद्रण करण्यात आले आहे- त्यांनी कार्यक्रमामध्ये या पुस्तकातील उताऱ्याचे वाचन केले. त्यानंतर मूळ इंग्रजी पुस्तकामधील याच उताऱ्याचे श्री. वत्सल डॉक्टर यांनी वाचन केले.

त्यानंतर राजघाट बेझंट स्कूलमधील माजी शिक्षक श्री. किरण खलप यांच्याशी स्टोरीटेलच्या श्रीम. सुरोमिता रॉय यांनी संवाद साधला. श्री. किरण खलप यांनी कृष्णमूर्तींच्या शिकवणुकीने प्रेरित झाल्यामुळे महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण झाल्यावर तडक वाराणसीची वाट धरून पुढील चार वर्षे तेथील कृष्णमूर्ती शाळेतील विद्यार्थ्यांना विविध विषयांमध्ये मार्गदर्शन केले. या शाळेमध्ये शिकवीत असताना नवनवीन पद्धतींचा अवलंब करण्यास त्यांना कशी मुभा दिली गेली, एखाद्या विषयाचा अभ्यास करताना त्यातील विषयवस्तूच्या विविध पैलूंचे प्रत्यक्ष निरीक्षण करून त्याबद्दल प्रश्न उभे करण्यामधून विद्यार्थ्यांना शिकण्याचा आनंद कसा मिळतो आणि त्यात कसे खरे शिकणे असते याबद्दल त्यांनी आपल्या आठवणींमधील काही किस्से सांगितले.

श्रोत्यांनीही काही प्रश्न विचारले. कृष्णमूर्ती शाळांमधून शिकून बाहेर पडणाऱ्या मुलांना बाहेरील जगाशी जुळते घेणे शक्य होते का? या प्रश्नाचे उत्तर देताना श्री. किरण यांनी काही मुद्दे मांडले. कृष्णमूर्तींच्या शाळांमध्ये भीती, तुलना, स्पर्धा यांचा अभाव असलेल्या वातावरणात विद्यार्थ्यांचे एकमेकांशी आणि शिक्षकांशीही मैत्रीचे, जवळचे नाते निर्माण होते. मुलांना आपल्या नैसर्गिक अभिरुचींची जाणीव होते. निरीक्षण, श्रवण या क्षमता जोपासल्या गेल्यामुळे आपल्या समोरील परिस्थितीला संवेदनशीलतेने सामोरे जाणे शक्य होते. शाळेचे माजी विद्यार्थी, आपल्याला अशा शालेय जीवनापासून लाभलेल्या - जीवनाकडे समग्रतेने पाहण्याच्या - क्षमतेची आता आयुष्यातील पुढच्या टप्प्यावर जाणीव होते असे सांगतात, असे श्री. किरण म्हणाले.

कृष्णमूर्तींच्या शिकवणुकीच्या त्यांच्या स्वत:च्या जीवनातील स्थानाबद्दल बोलताना ते म्हणाले की जीवनाचा अर्थ शोधत असताना कृष्णमूर्तींच्या शिकवणीमधून त्यांच्या आंतरिक शोधामध्ये अतीव स्पष्टता आली आणी अशी स्पष्टता आल्यावर आपल्याला इतर कुठच्याही बाह्य तत्वप्रणालीची गरज वाटत नाही. ते पुढे म्हणाले की कृष्णमूर्ती कोणतीही पद्धत, कोणताही नियम घालून देत नाहीत. ते म्हणतात की सर्वात पहिली गोष्ट म्हणजे स्वत:ला समजून घेणे - ते आवश्यक आहे. या स्पष्टतेमुळे आपल्या व्यवसाय चालवण्यात दिसून येणाऱ्या काही महत्वपूर्ण गोष्टींबद्दल ते बोलले. सहकाऱ्यांबरोबर जिव्हाळ्याचे संबंध, व्यावसायिक प्रस्तावांवर संपूर्णपणे एकत्र विचारमंथन करण्याची-मोकळेपणाने प्रश्न उभे करण्याची दृष्टी, नियंत्रण ठेवण्याची-वर्चस्वाची भूमिका नसल्यामुळे सहकाऱ्यांमध्ये असणारी नैतिकता, प्रामाणिकपणा अशा अनेक पैलूंबद्दल ते बोलले. एकूणच आयुष्यात मानसिक सुरक्षिततेची मागणी भासत नसल्यामुळे भीतीची, स्पर्धेची भावना असत नाही; पशुपक्ष्यांचे संरक्षण, खेळाडुंना विविध प्रकारचे साहाय्य पुरवणे अशा विविध क्षेत्रांमध्येही आपल्याला संवेदनशीलतेने कार्य करता येते, असे ते म्हणाले.

कार्यक्रम संपल्यानंतरही उपस्थितांनी ऑडिओ पुस्तकांबद्दल चौकशी केली, तसेच अनेकांनी श्री. किरण खलप यांच्याशी चर्चा केली.

ही मराठी ऑडिओ पुस्तके स्टोरीटेलच्या संकेतस्थळावर https://www.storytel.com/in/en/ उपलब्ध असून, तिथे या पुस्तकांच्या ध्वनिमुद्रणाचे नमुने ऐकण्याची सोय देखील आहे.

# कृष्णमूर्ती शाळांविषयी माहितीपट

**ऑक्टोबर २७ :** 'द इंटीग्रल स्पेस' या केंद्रामध्ये राजीव मेहेरोत्रा यांनी दिग्दर्शित केलेला 'द अवेकनिंग ऑफ इंटलिजन्स' हा कृष्णमूर्ती शाळांवरील माहितीपट दाखविण्यात आला. त्यानंतर झालेल्या चर्चेमध्ये अनेक श्रोत्यांनी या शाळांमधील शिक्षणपद्धतीबद्दल प्रश्न विचारले. ऋषी व्हॅलीमधील श्रीम. राधिका आणि श्री. हान्स हर्झबर्गर यांनी श्रोत्यांशी संवाद साधला.

स्पर्धा आणि तुलना नसलेल्या अशा या शाळांमधून शिकून बाहेर पडणाऱ्या मुलांना बाहेरील स्पर्धामय जगाशी कसे जुळते घेता येते, ह्या प्रश्नावर बरीच चर्चा झाली. श्रीम. राधिकांनी आपल्या अनेक अनुभवांमधून अशा शाळांसमोर आजच्या काळात असलेल्या विविध आव्हानांबद्दल चर्चा केली.

निसर्गसंवर्धन, सेंद्रीय शेती, पारंपारिक नैसर्गिक खते, बी-बियाणांबद्दलचे गंभीर प्रश्न, औद्योगिक प्रगतीच्या नावाखाली स्थानिक आदिवास्यांचे, गरीब शेतकऱ्यांचे होत असलेले शोषण अशा अनेक महत्त्वाच्या बाबींवर कार्य करीत असलेल्या व्यक्तींबरोबर या शाळांमधून संवाद होत असतात. तसेच विविध कला-साहित्य क्षेत्रांमध्ये नैपुण्य मिळावलेल्या, मूलभूत स्तरावर प्राचीन कलाविषयांवर गहन संशोधन करणाऱ्या मर्मज्ञ, चिंतनशील व्यक्ती काही काळ शाळेमध्ये राहून विद्यार्थ्यांना आपल्या कार्यक्षेत्राची सखोल माहिती देतात, त्यांची चिकित्सक वृत्ती जागवतात. हे सारे येथील विद्यार्थ्यांना पुढील आयुष्यात वेगळ्या दृष्टीने जीवनाकडे पाहण्यास, वेगळे कार्यक्षेत्र निवडण्यास मदत



करू शकतात. सृष्टीसौंदर्य, जैवविविधता, आपले निकटवासियांशी असलेले नातेसंबंध, तसेच जागतिक, वैश्विक स्तरावरील अनुबंध अशा अनेकविध गोष्टींबद्दल संवेदनशीलता निर्माण होण्यास पूरक वातावरण तिथे मिळते.

कृष्णमूर्तींची जीवनदृष्टी जाणून घेण्याची उत्कट इच्छा, त्यांच्या शाळांमधून त्या अनुषंगाने होत असलेल्या प्रयोगांबद्दलचे कुतुहल, अनेक आधुनिक तंत्रांनी जीवन व्यापून टाकलेल्या आजच्या जगामध्ये बालकांच्या शिक्षणासाठी असा पर्याय परिणामकारक ठरू शकतो का हा मनात असलेला प्रश्न असे तिथे जमलेल्या श्रोतृवर्गाचे चित्र होते. केवळ उपजीविकेसाठी कौशल्य मिळवण्याच्या दृष्टीने शिक्षणाकडे न पाहता त्यातून जीवनाच्या समग्रतेची भावना कशी जोपासली जाईल याबद्दल अनेकांना कळकळ असल्याचे या संवादामधून दिसून आले.

# बदलत्या काळातील शिक्षण




**सप्टेंबर १०-११, २०१८:** KFI च्या मुंबई केंद्राच्या सहयोगाने बॉम्बे केंब्रिज गुरूकुल या संस्थेच्या डॉ. एस्. राधाकृष्णन् स्कूल, मालाड या शाळेतर्फे 'बदलत्या काळातील शिक्षण' या विषयावर मुंबईमध्ये एक परिषद आयोजित करण्यात आली होती. या परिषदेत ऋषी व्हॅली स्कूलमधील एक अनुभवी शिक्षक श्री. अलोक माथुर यांनी Beyond the Divided Self : Educating for Today and Tomorrow या विषयावर भाषण केले. कृष्णमूर्तींच्या शिक्षणविषयक दृष्टीकोनाबद्दल काही मुख्य मुद्दे मांडून त्यांच्या शाळांमधून शिक्षक आणि विद्यार्थ्यांमधील नाते कसे सहजतेचे असते, स्पर्धा-तुलना या गोष्टी नसल्यामुळे मुलांमधील नैसर्गिक प्रतिभा कशा फुलतात, अत्यंत मोकळ्या वातावरणातही त्यांना आपल्यावरील जबाबदारीची जाणीव असण्यासाठी त्यांच्याशी कशा प्रकारे संवाद साधले जातात, पर्यावरण, सामाजिक अन्याय, आजुबाजूच्या परिसरातील गावकऱ्यांच्या समस्या इ. विषयी त्यांच्यामध्ये संवेदनक्षमता असण्यासाठी कसे विविध उपक्रम राबविले जातात यांची त्यांनी माहिती दिली. परिषदेतील परिसंवादातही त्यांनी भाग घेतला.

अनेक श्रोत्यांनी कृष्णमूर्तींच्या शाळांमधील शिक्षणपद्धतीविषयी आपल्या शाळांमध्ये येऊन अधिक माहिती देण्याची श्री. अलोक माथुर यांना विनंती केली. परिषदेमध्ये शिक्षणाशी निगडीत नव्याने सामोऱ्या येणाऱ्या अनेक आव्हानांवर चर्चासत्रे झाली.

## पुस्तक प्रदर्शनात सहभाग

३० सप्टेंबर ते ७ ऑक्टोबर २०१८ या दरम्यान सिल्वासा येथे भरलेल्या पुस्तक प्रदर्शनात फाउंडेशनच्या मुंबई केंद्राने भाग घेतला होता. अनेक शैक्षणिक संस्थांमधील विद्यार्थी आणि शिक्षकांनी प्रदर्शनाला भेट दिली. कृष्णमूर्ती शाळांमधील शिक्षणविषयक दृष्टीकोन आणि शिक्षणाशी निगडित बाबींबद्दल त्यांच्याबरोबर चर्चा झाल्या. २४ ते ३० नोव्हेंबर २०१८ या दरम्यान अहमदाबाद येथे भरलेल्या राष्ट्रीय पुस्तक प्रदर्शनामध्येही मुंबई केंद्र सहभागी झाले होते. प्रदर्शनाला भेट देणाऱ्या अनेकांना कृष्णमूर्तींच्या जीवनदृष्टीचा यामुळे प्रथमच परिचय झाला. दोन्ही प्रदर्शनांमधून वाचकांकडून चांगला प्रतिसाद मिळाला.

# मुंबईमधील काही कार्यक्रम



**१७ जुलै २०१८ :** वांद्रे येथील रिट्रीट हाऊसचे डायरेक्टर फादर लॅन्सी प्रभू यांचा विल्सन कॉलेजच्या तत्त्वज्ञान विभागाच्या विद्यार्थ्यांबरोबर संवाद आयोजित करण्यात आला होता. त्यांचा विषय होता 'What are you doing with your Life?' त्यांच्या भाषणानंतर झालेल्या प्रश्नोत्तरांमध्ये विद्यार्थ्यांनी चांगला प्रतिसाद दिला. विल्सन कॉलेजमध्ये नियमीतपणे असे संवाद घडवून आणण्याची इच्छा तत्त्वज्ञान विभागाच्या प्रमुख श्रीम. हर्षा बाडकर यांनी प्रदर्शित केली.

**१० ऑक्टोबर आणि २१ डिसेंबर २०१८:** विल्सन कॉलेजमधील तत्वज्ञान विभागातील विद्यार्थ्यांबरोबर श्री. विनय दाभोळकर यांची दोन संवादसत्रे झाली. Think On These Things या पुस्तकातील कृष्णमूर्तींच्या विद्यार्थ्यांबरोबर झालेल्या प्रश्नोत्तरांचा संदर्भ घेऊन त्यांनी 'आपल्याला प्रसिद्धीची हांव का असते?' आणि 'प्रगती या शब्दाचा अर्थ काय आहे?', अशा प्रश्नांवर चर्चा केली.

कृष्णमूर्ती आपल्याला कुठच्याही गोष्टीचा केवळ स्वीकार न करता त्याबद्दल प्रश्न उभे करणास उद्युक्त करतात, ह्या अतिशय महत्वाच्या मुद्याकडे त्यांनी विद्यार्थ्यांचे लक्ष वेधले.

श्री. विनय म्हणाले, की भौतिक क्षेत्रामधील प्रगती ही काळाच्या माध्यमातून होत असते. परंतु मानसिक क्षेत्रामध्ये प्रगतीची कल्पना हा एक भ्रम असतो. मानसिकरित्या काळ ही एक कल्पना आहे. भूतकाळ आणि भविष्यकाळ हे आपण स्मृतीच्या माध्यमातूनच अनुभवत असतो.

श्री. विनय म्हणाले की जर आपली मते अतिशय ठाम आणि पूर्वग्रहदूषित असली तर सत्याचा शोध घेण्यासाठी आपण प्रयोगशील असू शकत नाही. परंतु जर आपल्या पूर्वग्रहांचा खोटेपणा आपल्याला दिसून आला तर एका क्षणात आपल्यामध्ये बदल होऊ शकतो. स्पष्टतेमधून जी कृती होते ती खोलवरच्या संस्कारबद्धतेमधून होणाऱ्या कृतीपेक्षा अगदी वेगळी असते.

प्रश्नांची चटकन उत्तरे शोधण्याऐवजी थोडी संदिग्धता ठेवून प्रश्नांना कार्यरत असण्यास वाव दिला पाहिजे, त्यातूनच आपल्या संस्कारबद्धतेची उकल होईल, असे ते म्हणाले.

एका विद्यार्थ्याने असा मुद्दा मांडला की आपले शिक्षण पूर्ण झाल्यानंतर एका जबाबदार, प्रौढ आयुष्याच्या उंबरठ्यावर उभे असताना जर प्रत्येक गोष्टीबद्दल शंका उत्पन्न झाल्या तर ते कदाचित हानीकारकच होईल. श्री. विनय म्हणाले की, आपल्याला काय महत्त्वाचे वाटते हे समजणे अतिशय महत्त्वाचे आहे. उपजीविकेसाठी आपण जो मार्ग निवडू त्यामागे आपला प्रेरक हेतू काय आहे, याबद्दल जर स्पष्टता असेल तर पुढील आयुष्यात संघर्ष निर्माण होणार नाही. स्पष्टता नसली तर तिथे कल्पना, भ्रम असतात.

जिथे स्पष्टता असते तिथे ठाम मताग्रहांचा ताठरपणा नसतो. तिथे प्रत्येक क्षणाला शिकणे असते, आकलन होत असते, असे म्हणून श्री. विनयनी या संवादाची सांगता केली.

**ऑक्टोबर १३ :** साठ्ये कॉलेजच्या तत्त्वज्ञान विभागातील प्राध्यापिका मृणाल जोशी आणि सह्याद्री शाळेचे एक पालक श्री. मानस सिंग यांच्या पुढाकाराने तत्वज्ञान विषयाच्या विद्यार्थ्यांबरोबर मुंबईमध्ये एक संवाद आयोजित करण्यात आला होता. सुरुवातीला श्रीम. वासंती पडतेंनी कृष्णमूर्तींच्या अत्यंत पुरोगामी जीवनदृष्टीचा मुलांना परिचय करून दिला. विविध तत्वज्ञान प्रणालींचा अभ्यास करत असलेल्या या विद्यार्थ्यांसाठी कुठच्याही चौकटीत न बसणाऱ्या अशा या मूलगामी शिकवणीची वासंतीताईनी संक्षिप्तपणे आणि स्पष्टतेने उकल केली. मुलांनी कुतुहलाने अनेक प्रश्न विचारले, त्यातून मानवाचा 'स्व' कसा घडत असतो आणि आपल्या कृतींमागील दडलेल्या हेतुंमुळे – ज्यांची आपल्याला अनेकदा जाणीवही नसते – आपल्या 'स्व'ला कशी पुष्टी मिळत जाते यावर बरीच चर्चा झाली. अशा संवादांचे पुढेही आयोजन करण्यात यावे असे सर्वांनाच वाटले.

# नाशिक येथील प्रदर्शन




'तरुणांकरिता : जे. कृष्णमूर्ती' या शीर्षकाखाली नाशिकमध्ये गेल्या वर्षी प्रथमच भरविलेल्या द्विभाषिक (इंग्रजी-मराठी) प्रदर्शनास नाशिककरांकडून मिळालेल्या उत्तम प्रतिसादाने तेथील कृष्णमूर्ती अभ्यासक मंडळास पुन्हा एकदा काही नवीन पॅनेल्ससह हे प्रदर्शन भरविण्यास प्रोत्साहित केले. हे प्रदर्शन कुसुमाग्रज स्मारक परिसरातील आर्ट गॅलरी, नाशिक येथे १४ – १६ डिसेंबर, २०१८ या दिवसात भरविण्यात आले होते. जे. कृष्णमूर्तींचे निवडक मूळ साहित्य आणि त्याला अनुरूप असणारी छायाचित्रे मिळून हे प्रदर्शन बनविले आहे. ह्या छायाचित्रांचा आशय आणि कृष्णमूर्तींचे निवडक मूळ साहित्य एकमेकांना पूरक असल्याने आशय अधिक ठळकपणे उमजला आहे असे मत प्रेक्षकांनी प्रदर्शित केले.

वर्तमानातील गुंतागुंतीचा पेचप्रसंग हाताळण्यास जुन्या पद्धती फार अपुऱ्या आहेत ह्या वस्तुस्थितीविषयी कृष्णमूर्ती तरुणांना सावध करीत असत. हा संकटकाळ, त्याला हाताळण्याकरिता संपूर्ण नवीन पद्धतीची मागणी करीत आहे, आणि हे फक्त ताजातवान्या, युवा आणि समजूतदार अशा मनास शक्य आहे. शारीरिक वयाची मर्यादा न बाळगता अशा गुणवत्तेचे मन घडवू शकेल असे काय आहे? या अत्यंत महत्त्वाच्या गंभीर प्रश्नाचा शोध घेणारे हे प्रदर्शन आहे.

आजच्या पिढीस अशा प्रदर्शनाची खरोखर गरज आहे असे अनेक प्रेक्षकांनी आवर्जून सांगितले. जवळ जवळ ३००हून अधिक प्रेक्षकांनी ह्या प्रदर्शनास भेट दिली आणि अत्यंत उत्सुकतेने ह्या प्रदर्शनास प्रतिसाद दिला. जवळ जवळ ५०० पुस्तकांची विक्री करण्यात आली.

## पुस्तक परिचय

### A Door Open For Anyone
Krishnamurti On Study Centres




कृष्णमूर्तींनी १९३० च्या सुमारास भारतात शाळा सुरू केल्या. परंतु त्यांच्या आयुष्याच्या शेवटच्या दशकात प्रौढ आणि तरुण मंडळींसाठी काहीतरी निश्चित स्वरूपात केले पाहिजे असे त्यांना वाटू लागले आणि त्यांनी त्यांच्या जवळच्या सहकाऱ्यांबरोबर अध्ययन केंद्र सुरू करण्यासंबंधात चर्चा केली. अशा अभ्यास केंद्राला काय नाव द्यावे – असे नाव की, जे आपल्या उद्देशाचे नेमके स्वरूप स्पष्ट करेल; अनेक नावे सुचविली गेली – प्रौढ अभ्यास केंद्र, आश्रम, आधुनिक आश्रम, आध्यात्मिक शिक्षण केंद्र वगैरे. परंतु कृष्णमूर्तींनी एका गोष्टीचा आग्रह धरला की त्यांच्या शिकवणीचा अभ्यास म्हणजे एखाद्या शैक्षणिक संस्थेमध्ये असते तशी बौद्धिक कसरत नाही किंवा एखाद्या धार्मिक संस्थेमध्ये असतो तसा ब्रह्मज्ञानाचा अभ्यासही नाही.

कृष्णमूर्तींचा अध्ययन केंद्राविषयीचा दृष्टिकोन, अशा केंद्रामध्ये असलेल्या अकृत्रिम स्वाभाविक सौंदर्याभिरुचीबद्दल आस्था, तसेच मनाला अंतमुर्ख करणाऱ्या वातावरणाबद्दल कळकळ, तेथील व्यवस्थापक तसेच तेथे येणारे अभ्यासक यांची जबाबदारी, तेथे होणाऱ्या संवाद-चर्चांची गुणवत्ता, धर्मशील मनाचे स्वरूप, या आणि इतर अनेक महत्त्वाच्या आणि गहन बाबींच्या अनुषंगाने केलेली चिंतने या पुस्तकात समाविष्ट आहेत.

या पुस्तकाचे दोन भाग आहेत. पहिल्या भागात १९७७ ते १९८५ पर्यंतच्या काळात कृष्णमूर्तींचे त्यांच्या सहकाऱ्यांबरोबर झालेले संवाद आणि त्यांनी या विषयांवर वेळोवेळी दिलेल्या सूचना यांचा समावेश आहे. दुसऱ्या भागात कृष्णमूर्तींनी ४०च्या दशकाच्या उत्तरार्धापासून केलेल्या भाषणांनंतर झालेल्या प्रश्नोत्तरांचा समावेश आहे.

१२० पृष्ठांचे हे पुस्तक फाउंडेशनच्या मुंबई केंद्रावर उपलब्ध असून त्याची किंमत रु. २५०/– आहे.

**कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया,** वसंतविहार, १२४, १२६, ग्रीनवेज रोड, चेन्नई – ६०० ०२८. • दूरध्वनी : ०४४०–२४९३७८०३/२४९३७५९६ • ईमेल : info@kfionline.org • वेबसाईट : www.kfionline.org • कृष्णमूर्तींच्या भाषणांच्या आणि संवादांच्या अनेक डिव्हिडीज् आता आपण ऑर्डर पाठवून मागवू शकता. ही यादी वेबसाईटवर उपलब्ध आहे. • दर महिन्याच्या तिसऱ्या शुक्रवारपासून रविवार संध्याकाळपर्यंत निवासी अध्ययन शिबीरे आयोजित केली जातात.

9 - 10 February 2019 Tamil Gathering : 'The Challenge of Change'
23 - 24 March 2019 Understanding Human Relationship

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, बेंगलुरू :** संपर्क: द स्टडी, व्हॅली स्कूल कॅंपस, १७ कि.मी. कनकपुरा रोड, थातगुणी पोस्ट, बेंगलुरू-५६००६२. दूरध्वनी : ०८० – २८४३५२४३ • ईमेल : kfistudy@gmail.com • वेबसाईट : www.kfistudy.org

१७-२० जानेवारी २०१९ Exploring Anxiety, Stress & Inner Conflict
०७-१० फेब्रुवारी २०१९ Silence, Stillness, & Meditation
२८-३१ मार्च २०१९ Karnataka JK Adhayana Shibira: Understanding Fear
Workshops on : Nurturing Creativity in Education

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **Edition 3** | February 2 -4, 2019 | **Edition 4** | March 16 - 18, 2019 | **Edition 5** | June 15 - 17, 2019 |
| **Edition 6** | July 20 - 22, 2019 | **Edition 7** | August 17 - 19, 2019 | **Edition 8** | September 14 - 16, 2019 |
| **Edition 9** | October 12 - 14, 2019 | **Edition 10** | November 16 - 18, 2019 | **Edition 11** | December 14 - 16, 2019 |

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, राजघाट- वाराणसी:** कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया, राजघाट फोर्ट, वाराणसी २२१ ००१. दूरध्वनी: ०५४२ – २४४१२८९ / २४४०३२६ • ईमेल : studycentre@rajghatbesantschool.org • वेबसाईट : www.rajghatbesantschool.org

5 – 10 February, 2019 International Retreat : 'Can our daily life be rooted in compassion?'

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, सह्याद्री:** पोस्ट – तिवई हिल, तालुका खेड (राजगुरुनगर), जिल्हा – पुणे, पिन – ४१०५१३, महाराष्ट्र दूरध्वनी : (०२१३५) २८८७७२, २८८३४८, २०३४७५ • ईमेल : kfisahyadri.study@gmail.com • वेबसाईट : http://www.kscskfi.com

24 - 28 February 2019 What is holistic living?

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, ऋषी व्हॅली:** जिल्हा चित्तूर, आंध्र प्रदेश – ५१७३५२ दूरध्वनी : (०८५७१) २६०३७/६८६२२/६८५८२ • ईमेल : study@rishivalley.org • वेबसाईट : http://www.rishivalley.org

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, उत्तरकाशी:** पोस्ट रानारी, डुंडा ब्लॉक, जिल्हा उत्तरकाशी – २४९१५१. • ईमेल : krc.himalay@gmail.com दूरध्वनी : ९४१२४ ३६४२९/९४१५९८३६९० • वेबसाईट : http://www.jkrishnamurtionline.org भारतीय भाषांमधील संकेतस्थळ

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, कोलकाता:** कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया, ३०, देवदार स्ट्रीट, कोलकाता – ७०००१९. दूरध्वनी : (०३३) ४००८२३९८ • ईमेल : kfikolkata@gmail.com

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, कटक:** ओरिसा, पुरीघाट रोड, तेलेंगा बझार, कटक – ७५३००९, ओरिसा. दूरध्वनी : (०६७१) ६४१७९९० • ईमेल : kficuttackcentre@gmail.com • वेबसाईट : www.kficc.org

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, बदलापूर:** आनंद-विहार, जे. कृष्णमूर्ती सेल्फ एज्युकेशन सोसायटी, जांभिळघर, राहाटोली गावाजवळ, बदलापूर (प.), ता. ठाणे, पिनकोड- ४२१५०३. दूरध्वनी : (०२२) २६६००२२४, २४२२३१९९ • ई मेल : jksesbadlapur@gmail.com • वेबसाईट : www.jkses.org

# स्वातंत्र्यात अधिकारशाही नसते

**स्वा**तंत्र्याबरोबर सृजनशीलता येते. संघर्षातून होणाऱ्या निर्मितीशी ह्याचा काही संबंध नाही. मन संस्कारबद्ध असेल तर स्वातंत्र्य नसते. सामाजिक, आर्थिक किंवा धार्मिक संस्कृतीचे फळ म्हणजे संस्कार. संस्कारबद्ध मन अतिशय मर्यादित अशा एका विशिष्ट क्षेत्रातच कार्यरत असते. जेव्हा उच्च तंत्रज्ञानाविषयीच्या क्षेत्रात किंवा संस्कारबद्ध अशा कार्यक्षेत्रात काम केले जाते तेव्हा त्याला सर्वसाधारणपणे सृजनशीलता म्हटले जाते. ही संस्कारबद्ध गती स्वत:ची एक ऊर्जा निर्माण करते आणि ही ऊर्जा विज्ञान, वाङ्मय, वेगवेगळे इतिहास व तत्त्वज्ञान ह्यात प्रकट होते.

परंतु हे सर्व संस्कारबद्ध क्षेत्रामध्येच घडत असते, मग ते क्षेत्र संकुचित असो किंवा विशाल असो. हे कार्य एक मार्ग बनवते जो स्वीकारला जातो, अवलंबिला जातो, परंतु तरीही हे संस्कारांमध्येच कोंडलेले असते. मनुष्य त्या मर्यादांमध्ये स्वातंत्र्य शोधतो व ते स्वातंत्र्य वापरणे ह्याला इच्छास्वातंत्र्य किंवा निवड करण्याचे स्वातंत्र्य असे म्हटले जाते. परंतु तरीही त्याचे संस्कारांनीच मार्गदर्शन केलेले असते, संस्कारांनी त्याला आकार दिलेला असतो. हे जणु काही एखाद्या व्यक्तीने तुरुंगाच्या चार भिंतींमध्ये स्वातंत्र्य मागण्यासारखेच असते, मग त्या तुरुंगाची लांबी-रुंदी मोठी असो किंवा छोटी. ते स्वातंत्र्य नव्हे.

स्वातंत्र्य ही अगदी वेगळी गोष्ट आहे. स्वातंत्र्य म्हणजे शब्दांच्या सहाय्याने आणि शब्दांविना संस्कारबद्धतेचे आकलन होणे आणि त्यामुळे मनाला त्या पलीकडे जाता येणे. हे स्वातंत्र्य पुस्तकात नाही किंवा दुसऱ्याकडून मिळणारे नाही आणि ते एखादा आदर्शही नाही. ते कुठल्याही सरावाने, शिस्तीने खरेदी करता येत नाही; कारण सराव व शिस्त ह्यात अधिकार व अनुज्ञा अभिप्रेत आहेत. ह्या स्वातंत्र्यात दिशा किंवा अधिकार नाही. हे स्वातंत्र्य म्हणजे प्रज्ञा आणि ह्यामध्ये जबाबदारीची जाणीव असते. परिस्थिती व घटनांचा त्याच्यावर काबू नसतो. विचाराने स्वत:भोवती उभारलेल्या तुरुंगाला संपूर्ण नकार म्हणजे हे स्वातंत्र्य. अशा तऱ्हेचा नकार म्हणजेच स्वातंत्र्याची होकारार्थी कृती. जिथे अव्यवस्था असते तिथे हे स्वातंत्र्य असू शकत नाही. अंतर्बाह्य अव्यवस्थेमुळे अधिकार, हुकुमशहा, सत्ताधारी ह्यांची आवश्यकता भासते.

स्वातंत्र्यामध्ये अधिकारशाही नसते. स्वातंत्र्याचा अधिकारशाहीशी कधीच संबंध आलेला नसतो. अधिकाराचा धि:कार म्हणजे स्वातंत्र्य नव्हे तर त्याचा संपूर्ण अभाव म्हणजे स्वातंत्र्य. आंतरिक व बाह्य अधिकार व कायदा हे विचाराने घडवले आहेत. बाह्य अधिकारशाही कधी तर्कशुद्ध तर कधी तर्कविरोधी असू शकते, परंतु तिचेही स्वत:चे असे एक स्थान आणि स्वत:ची अशी जबाबदारी असते. त्याकडे दुर्लक्ष करता येत नाही. स्वातंत्र्याची प्रज्ञा असते आणि तिला अधिकाराची गरज व मर्यादा कळतात. आंतरिक अधिकार सूक्ष्म, जटील व खोलवर असतो. मार्गदर्शन, जे खात्री व विश्वास देते, ते शेवटी साचेबंद आदर्श बनते व मग ती अधिकारशाही ठरते. ही अधिकारशाही पारंपरिक असू शकते किंवा एखाद्या व्यक्तीची किंवा एखाद्या चिन्हाची किंवा एखाद्या कल्पनेचीही असू शकते. मनाला जाणीवपूर्वक किंवा नकळत स्वत:च्या अस्वस्थतेचे व अव्यवस्थेचे भान येते व त्यामुळे ते आंतरिक व बाह्य अधिकारशाही निर्माण करते. विस्कळीत लोकसमुहाला तात्काळ नेता सापडतो जो मग मार्गदर्शन करतो व अधिकार गाजवतो. त्यावरची प्रतिक्रिया म्हणजे स्वातंत्र्य नव्हे. अव्यवस्थेचा व अस्वस्थतेचा गुणधर्म समजणे आणि त्या पलीकडे जाणे म्हणजे स्वातंत्र्य.

अस्वस्थता व अव्यवस्था ह्यामुळे अधिकार स्वीकारला जातो. ह्याची परिणती अधिकारशाहीत होते आणि त्याला प्रतिक्रिया म्हणजे तिच्याशी जुळवून घेणे किंवा ती नाकारणे. ह्या नाकारण्यातच दुसरी अधिकारशाही गृहित असते. जिथे स्वातंत्र्य नसते, तिथे अधिकार असतोच. ह्याचे पर्यवसान दडपशाहीमध्ये वा पळवाट शोधण्यामध्ये होते. ह्या सर्व गोष्टींचा शेवट एखादे तत्त्व किंवा श्रद्धा ह्यामध्ये होतो. मग ह्या गोष्टीच मानदंड बनून वर्चस्व गाजवतात. कोणत्याही गोष्टीचे कारण हे कधीच कायमस्वरूपी नसते, 'कारण' हेच परिणाम बनते आणि हा 'परिणाम' हे पुढचे कारण बनते. जेव्हा हे सुस्पष्टपणे समजते-बौद्धिक पातळीवर नव्हे तर प्रत्यक्षात प्रत्यय येतो-तेव्हा वर निर्देश केलेल्या त्या साखळीला नकार देणे म्हणजेच स्वातंत्र्य असते. ज्ञानाचीही स्वत:ची अधिकारशाही- अनुभव व स्मृती असते. परंतु माणूस जोपर्यंत त्या क्षेत्रात राहतो तोपर्यंत स्वातंत्र्याच्या सृजनात्मक गतिशीलतेला अस्तित्व नसते. स्वातंत्र्य म्हणजे अवकाश व अवकाश म्हणजे व्यवस्था.

*Letters to Schools -*
*The Whole Movement of Life is Learning,* Chpt. 68

# अधिकार शिकण्याला प्रतिबंध करतो

**आ**पण सर्वसाधारणपणे अभ्यास करून, पुस्तके वाचून, अनुभवामधून किंवा इतरांकडून मिळणाऱ्या सूचनांमधून शिकत असतो. या नेहमीच्या शिकण्याच्या पद्धती आहेत. आपण काय करावे-करू नये, कोणता विचार करावा-करू नये, भावना कशी जाणावी, प्रतिक्रिया कशी द्यावी हे सगळे स्मृतीमध्ये साठवतो. अनुभवामधून, अभ्यास करून, विश्लेषण करून, आत्मनिरीक्षणाच्या कसोटीमधून आपण ज्ञान स्मृतीमध्ये साठवित असतो. ही स्मृती नंतर पुढील आव्हानांना प्रतिसाद देते. त्यामधून अधिकाधिक शिकणे होत असते. जे शिकले जाते ते पुन्हा स्मृतीत ज्ञान म्हणून साठवले जात असते आणि जेव्हा जेव्हा आव्हाने उभी राहतात तेव्हा या ज्ञानामधून कृती होत असते किंवा ज्या ज्या वेळी आपल्याला काही करायचे असते तेव्हा हे ज्ञान मदत करते.

शिकण्याचा संपूर्णपणे निराळा असा दुसरा मार्ग आहे. परंतु तो समजून घेण्यासाठी आणि अशा निराळ्या पद्धतीने शिकण्यासाठी तुम्ही अधिकारी वृत्तीपासून पूर्णपणे मुक्त असले पाहिजे, नाहीतर तुम्हाला फक्त माहिती मिळेल आणि तुम्ही जे ऐकत असाल त्याचीच पुनरावृत्ती होईल. म्हणून अधिकार-सत्ता म्हणजे काय असते ते समजून घेणे फार महत्त्वाचे आहे. अधिकार शिकण्याला प्रतिबंध करतो. शिकणे म्हणजे स्मृतीमधून ज्ञान गोळा करणे नव्हे. स्मृतीचा प्रतिसाद नेहमी साचेबद्ध असतो, तिथे स्वातंत्र्य नसते. जो मनुष्य ज्ञानाच्या, सूचनांच्या ओझ्याखाली दबलेला आहे, तो जे काही शिकला त्या गोष्टीच्या भाराने ज्याला जडत्व आलेले आहे तो कधीच मुक्त नसतो. तो अतिशय असामान्य प्रतीचा विद्वान असू शकतो, पण त्याने केलेला ज्ञानसंचय त्याला मुक्त होऊ देत नाही. म्हणून तो ज्ञानाच्या भारामुळे शिकण्याची क्षमताच गमावून बसलेला असतो.

*The Book of Life:*
*Daily Meditations with Krishnamurti,* 14 January

# ज्ञान सत्ता बनते

जेव्हा ज्ञान संपादन करणे चालू असते तेव्हा तिथे शिकण्याची अवस्था नसते. ह्या दोन्ही विसंगत गोष्टी आहेत, त्या आंतर्विरोधी आहेत. शिकण्याच्या प्रक्रियेमध्ये अशी अवस्था अभिप्रेत असते जिथे –त्या मनामध्ये– पूर्वीचा अनुभव ज्ञान म्हणून संग्रहित केलेला नसतो. ज्ञान मिळवलेले असते तर शिकणे ही निरंतर चालणारी प्रक्रिया असते, जी संचयशील नसते आणि त्यात काही मिळवण्याची हाव नसते. म्हणून शिकण्याच्या प्रक्रियेमध्ये अशी अवस्था अभिप्रेत असते जिथे मनावर कोणताही अधिकार नसतो. ज्ञान – मग ते कोणत्याही प्रकारचे असो, त्यात अधिकाराची भावना असते. आणि जे मन ज्ञानाच्या अधिकारामध्ये सापडलेले आहे ते सहसा शिकू शिकत नाही. मन त्याच वेळी शिकू शकते जेव्हा संचय करण्याची प्रवृत्ती संपूर्णपणे थांबलेली असते.

कदाचित आपल्यापैकी बहुतेकांना शिकणे आणि ज्ञान गोळा करणे यातील फरक समजणे कठीण जात असेल. अनुभवामधून, वाचनामधून, ऐकण्यामधून मन ज्ञान गोळा करत असते. ती एक साठवण्याची प्रक्रिया असते. जे माहीत आहे त्यात भर घालण्याची प्रक्रिया आणि या ज्ञानाच्या पार्श्वभूमीवरून आपण कार्य करीत असतो. आता ज्याला आपण सर्वसाधारणपणे शिकणे म्हणतो ती हीच नवीन माहिती गोळा करण्याची प्रक्रिया असते. आणि आपण अगोदरच साठवलेल्या माहितीमध्ये आणखी भर घालणे असते. खरे तर मी संपूर्णपणे निराळ्याच गोष्टीबद्दल बोलत आहे. जे तुम्हाला आधीच माहित आहे त्यात भर घालणे असा शिकण्याचा अर्थ मी करीत नाही. तुम्हाला जेव्हा भूतकाळाची ज्ञान म्हणून आसक्ती नसेल तेव्हाच फक्त तुम्ही शिकू शकता, म्हणजेच जेव्हा तुम्ही काहीतरी नवीन पाहता, आणि आधीच ज्ञान असलेल्या माहितीच्या आधारे त्याचे विश्लेषण करता तेव्हा ते शिकणे नसते.

जे मन शिकत असते ते निरागस असते, परंतु जे मन केवळ माहिती गोळा करीत असते ते मन परिपक्व झालेले असते, साकळलेले असते, भूतकाळाने भष्ट झालेले असते. निरागस मन तात्काळ पाहते, ते सतत शिकत असते, संचय न करता, आणि असे मनच परिपक्व असते.

*The Book of Life:*
*Daily Meditations with Krishnamurti,* 21 September

# अधिकारभावना हानीकारक आहे

कृष्णमूर्ती : तुम्हाला माहीत असेल की जगभर –युरोपमध्ये आणि अमेरिकेत माणसं बंड करीत आहेत. ते आखून दिलेली परिमाणं मानत नाहीत. युरोपमध्ये दोन भयानक युद्धं झाली आहेत. शहरंच्या शहरं उद्ध्वस्त झाली आहेत आणि लाखो लोकांची हत्या झाली आहे. तेव्हा त्यांना आता पुढारी नकोसे झाले आहेत. राजकीय नेत्यांचा ते एक 'अटळ दु:ख' म्हणून स्वीकार करतात, परंतु त्यांना नेते नको आहेत कारण हिटलर, मुसोलिनी सारख्या जुलुमशहांचे अत्याचार त्यांनी अनुभवले आहेत. साऱ्या जगभरातच विद्रोहाची भावना पसरली आहे. परंतु एखाद्या साच्याविरुद्ध बंड म्हणजे विद्रोह नव्हेच.

मी आता ज्याबद्दल बोलणार आहे ते तुम्हाला समजेल की नाही हे मला माहित नाही. पण हा अतिशय जटील प्रश्न मी जास्तीत जास्त सोपा करून समजावण्याचा प्रयत्न करणार आहे.

विद्रोह दोन प्रकारचे असतात. एक प्रकारचा विद्रोह म्हणजे प्रतिक्रिया असते. प्रतिक्रिया म्हणजे काय हे आपण प्रथम पाहुया. जेव्हा तुमचे आईवडील तुम्हाला काही सांगतात आणि तुम्हाला ते करायचं नसतं तेव्हा तुम्ही बंड करता. तुमच्या समाजाची काही मागणी असते आणि तुम्ही समाजाविरुद्ध बंड करता. तुम्हाला स्वत:चं मत-प्रदर्शन करण्याचं स्वातंत्र्य हवं असतं आणि म्हणून तुम्ही प्रस्थापित परंपरेच्या, सर्वसामान्यपणे प्रमाण असलेल्या गोष्टींच्या विरुद्ध उभे राहता. त्या विद्रोहाला फारशी खोली नसते आणि त्याचा आवाकाही मोठा नसतो. काही लोक असतात जे हिंदू धर्म सोडून ख्रिस्ती धर्म स्वीकारतात. किंवा ते ख्रिस्ती धर्मीय असले तर तो धर्म सोडून कम्युनिस्ट बनतात, आणि जर साम्यवादी असले तर दुसरा काही 'इझम' अंगिकारतात. ही केवळ प्रतिक्रिया असते.

सर्व प्रतिक्रिया ह्या साहजिकच वरवरच्या असतात. पण असा विद्रोह असतो – आणि असायला हवा – एक वेगळ्या प्रकारचा विद्रोह, परंपरेच्या विरोधात किंवा सर्वसामान्यपणे प्रमाण असलेल्या गोष्टींच्या विरोधात तो फारसा नसतो, तर असा विद्रोह जो माणसाला जागृत करतो, त्याच्यासमोर प्रश्न उभे करतो.

प्रश्न उभे करणं म्हणजे काय, केवळ तुम्ही कशाचा विचार करत आहात त्याबद्दल प्रश्न करणं नव्हे, तर तुमच्या विचाराच्या रचनेबद्दलही प्रश्न करणं, अधिकारभावनेला प्रश्न करणं, सर्व परंपरेला प्रश्न करणं – त्याविरुद्ध विद्रोह करणं नव्हे तर त्याबद्दल प्रश्न उभे करणं; देवळांबद्दल, देवांबद्दल, गीता, उपनिषदं, सगळे स्वामी, योगी, ढोंगी राजकीय नेते – सगळ्यांबद्दल. एक प्रतिसाद म्हणून नव्हे तर सत्य काय आहे त्याचा शोध घेण्यासाठी. जे मन प्रश्न उभे करतं, सतत चौकशी करतं, कधीही नुसता स्वीकार करत नाही, असं मनच सर्जनशील असू शकतं, परंतु त्यासाठी निर्भीड मनाची गरज आहे. मुलभूतपणे, खोलपणे प्रश्न विचारण्याने एक नवीन मन जागृत होतं, जीवनाकडे पाहण्याची एक नवीन दृष्टी येते. आणि मला असं वाटतं की शिक्षण – विशेषत: अशा शाळांमधून – हे मुलांना प्रत्येक गोष्टीबद्दल प्रश्न उभे करण्यास उत्तेजन देणारं असलं पाहिजे. ज्याबद्दल तुम्ही विचारणा करू शकत नाही इतकं पवित्र जगात काहीही नाही.

तुम्ही कशाचाही केवळ स्वीकार करू नका, तर शोध घ्या. आणि शोध घेण्यासाठी तुम्ही केवळ बंड करू शकत नाही! तुम्ही चौकशी केली पाहिजे, शोध घेतला पाहिजे, विचारणा केली पाहिजे आणि अगदी थोड्या जणांना तुम्ही प्रश्न विचारलेलं आवडतं कारण प्रश्नांना उत्तरं देणं त्रासदायक असतं. ते तुम्हाला वरवरची उत्तरं देतात, बस्स. ते म्हणतात, 'तुम्ही असं केलं पाहिजे, ते तुमच्यासाठी चांगलं आहे.' किंवा ते शंकराची, बुद्धाची, गीतेमधली किंवा उपनिषदामधली वचनं सांगतात, जो खुळेपणा असतो. असे लोक निर्जीव असतात, त्यांच्यामध्ये चैतन्य नसतं. पण तुम्ही जेव्हा प्रश्न विचारण्यास सुरुवात कराल, शोध घेण्यास सुरुवात कराल, तेव्हा तुम्ही स्वत: शिकाल आणि अधिकारभावनेच्या सापळ्यात अडकणार नाहीत.

खचितच, शिक्षण हे तुम्हाला सशक्त, खंबीर, लवचीक, आत्मनिर्भर बनवणारं असलं पाहिजे. योग्य प्रश्न करणं आणि अयोग्य

(पृष्ठ १२ वर...

# या शोषणकर्त्यांना तुम्हीच जन्म दिलेला आहे

आध्यात्मिक जगामधे सुरक्षिततेचा शोध हा अमरत्वाच्या इच्छेच्या रूपात प्रकट होत असतो. चिरस्थायी, अनंत होण्याची इच्छा प्रत्येकाला असते. सगळे धर्म ज्या पारलौकिक अमर्त्यतेची खात्री देतात ती सूक्ष्मरूपातील अहंभावी सुरक्षितताच होय. आता होतं काय, की ज्याला तुम्ही 'अमरत्व' म्हणता अशा स्वकेंद्री नित्यतेची शाश्वती देणारी कोणीही व्यक्ती जाणता-अजाणता तुमच्याकरता अधिकारी (authority) बनते. जगातील निरनिराळे धर्म पाहिल्यास तुम्हाला दिसेल की सुरक्षा, मोक्ष, निरंतरतेच्या आपल्या लालसेपायी तुम्ही सूक्ष्म स्वरूपाची, निर्दय वर्चस्वस्थानं निर्माण केलेली आहेत आणि त्या वर्चस्वांचे, उच्चस्थानांचे, अधिकाऱ्यांचे तुम्ही पूर्णतः गुलाम झालेले आहात. अधिकारिता तुमच्या मनाला, तुमच्या प्रेमाला सदैव पांगळं करते आहे.

मग ह्या अधिकारितेचा अर्थ लावण्याकरता ज्यांना तुम्ही 'पुजारी, पुरोहित, धर्मोपदेशक' वगैरे म्हणता अशा मध्यस्थांची गरज भासते, जे वस्तुतः तुमचं शोषण करतात. (टाळ्या) टाळ्या वाजवण्यात बहुधा घाई करता आहात - कारण या शोषणकर्त्यांना तुम्हीच जन्म दिलेला आहे. (हशा, टाळ्या) कदाचित तुमच्यापैकी काहीजण आध्यात्मिक अधिकारितेला जाणीवपूर्वक उत्तेजन देत नसतीलही, पण सुप्तपणे, नकळतपणे तुम्ही अन्य तऱ्हेचे शोषणकर्ते घडवत असता. धर्मोपदेशकाकडे जात नाही म्हणजे तुम्ही शोषक वा शोषित नसता असं नव्हे.

सुरक्षिततेची, स्थैर्याची आस लागली की अधिकारिता निर्माण होतेच, आणि सुरक्षितता प्राप्त करण्यासाठी मदत वा मार्गदर्शन करण्याचं आश्वासन देणाऱ्या व्यक्तींना तुम्ही पुरते शरण जाता. त्यामुळे जगभरातील धर्म हे नीच हितसंबंधांचं आणि संघटित, झापडबंद श्रद्धेचं आगर बनले आहेत. (टाळ्या) सज्जनहो, एक सुचवू का? कृपया टाळ्या वाजवण्याची तसदी घेऊ नका, त्याने फक्त वेळ वाया जातो बाकी काही नाही.

मॉन्टेव्हिडेओ, युरुग्वे, जून २१, १९३५

...पृष्ठ ११ वरून)

प्रश्न करणं असे दोन्ही असतात, योग्य विद्रोह आणि चुकीचा विद्रोह. तुम्हाला योग्य विद्रोह करण्यास मदत करणं, मूलभूतपणे प्रश्न उपस्थित करण्यास मदत करणं हे खूप महत्वाचं आहे. योग्य विद्रोह करण्यासाठी तीक्ष्ण मनाची गरज आहे, आणि शिकण्याने बुद्धी तीक्ष्ण होते, तुम्ही जे वाचन करता त्याच्या अभ्यासाने तीक्ष्ण होते...

...तुम्हाला स्वतःबद्दल अवधान येणं, इतरांचं दुःख, दैनावस्था, निराशा पाहू शकणं हे शिक्षणाचा एक भाग आहे. तुमच्यासाठी शिक्षण म्हणजे इतरांचा कनवाळूपणे विचार करणं, सभ्यपणे वागणं, अतिशय गहनपणे प्रश्न उपस्थित करणं हे सारं आहे-अधिकारितेचा कधीही स्वीकार न करणं, कारण अधिकारभावना ही सर्वात वाईट गोष्ट आहे, हानीकारक गोष्ट आहे.

ऋषी व्हॅली येथे विद्यार्थ्यांशी संवाद,
१६ नोव्हेंबर, १९६१

**कृष्णमूर्तींविषयीच्या काही वेबसाईटस्:**

www.jkrishnamurti.org
www.kfionline.org
www.rishivalley.org
www.rajghatbesantschool.org
www.kfistudy.org
www.kscskfi.com
www.jkrishnamurtionline.org
www.kfa.org
www.kfoundation.org
www.kinfonet.org

जे. कृष्णमूर्ती यांची शिकवण सर्वांपर्यंत पोहोचविण्यासाठी 'कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया' ही संस्था कार्यरत आहे. फाउंडेशनने चेन्नई, ऋषी व्हॅली, बंगलोर, मुंबई, वाराणसी आणि सह्याद्री येथे अध्ययन केंद्रे, शाळा स्थापन केल्या आहेत. बऱ्याच ठिकाणी तेथील ग्रामीण समाजासाठी विकास केंद्रेही आहेत.

**कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडियाचे मुख्य कार्यालय:**
कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया,
वसंतविहार, १२४, ग्रीनवेज रोड,
चेन्नई - ६०० ०२८.
दूरध्वनी : ०४४ २४९३ ७८०३/७५९६
ई-मेल : info@kfionline.org
वेबसाईट : www.kfionline.org

**कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडियाचे मुंबई केंद्र:**
हिम्मत निवास, मलबार हिल येथे असून येथे कृष्णमूर्तींची सर्व पुस्तके, डिव्हीडीज् उपलब्ध आहेत.
संपर्क :- कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया,
मुंबई एक्झिक्युटिव्ह कमिटी, हिम्मत निवास,
३१, डोंगरसी मार्ग, मलबार हिल,
मुंबई-४००००६.
दूरध्वनी - ०२२ २३६३३८५६
ई-मेल : kfimumbai@gmail.com

'अंतरलहरी' ही वृत्तपत्रिका दर चार महिन्यांनी प्रसिद्ध होणारी पत्रिका आहे. कृष्णजींच्या शिकवणीचा अभ्यास करू इच्छिणाऱ्या व्यक्तींसाठी कृष्णमूर्तींच्या साहित्याची मराठी भाषांतरे, त्यांच्या शिकवणीसंबंधी लेख, संस्थेच्या उपक्रमांची, अभ्यासकेंद्रांची तसेच पुस्तके वगैरेंची माहिती इ. ह्या पत्रिकेत प्रकाशित केली जाईल. आपल्याला ही पत्रिका घरपोच हवी असल्यास आमच्या मुंबई केंद्राच्या पत्त्यावर पत्र किंवा ई-मेल द्वारा कळवावे. कृपया आपले नाव, संपूर्ण पत्ता, दूरध्वनी आणि ई-मेल ही माहिती कळवावी.

*Published in January, May, September*

Periodical

*Registered with The Registrar of Newspapers for India under No. MAHMAR/2008/25259*

*If undelivered please return to :*
**Krishnamurti Foundation India**
Mumbai Executive Committee, Himmat Niwas, 31, Dongersey Road,
Malabar Hill, Mumbai - 400 006.
Tel.: (022) 2363 3856 Email : kfimumbai@gmail.com
Websites : www.kfionline.org, www.jkrishnamurti.org



*Printed and Published by SHRI P V DABHOLKAR on behalf of KRISHNAMURTI FOUNDATION INDIA, MUMBAI EXECUTIVE COMMITTEE, HIMMAT NIWAS, 31, DONGERSEY ROAD, MALABAR HILL, MUMBAI 400 006. Editor : SMT. VASANTI PADTE*
*Printed at INDIA PRINTING WORKS, 42, G. D. AMBEKAR MARG, WADALA, MUMBAI 400 031.*